महासागर
अमरावती
शनिवार, दि. 26 ऑक्टोंबर 2024
पान 3

# मोर्शी वि.स.मतदारसंघात आतापर्यंत 102 उमेदवारी अर्जाची उचल

## तीन नामनिर्देशन पत्र दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.25 )-** मोर्शी विधानसभा मतदार संघात आज चौथ्या दिवशी 6 इच्छूक उमेदवारांनी 10 फॉर्मची उचल केली आहे. अपक्षांनी चार फॉर्म, शिवसेना उबाठा गट दोन फॉर्म, बहुजन वंचित आघाडी दोन फार्म, अखिल भारतीय हिंद क्रांती पार्टी एक फार्म आणि विकास इंडिया पार्टी एक फार्मची उचल केली आहे.आतापर्यंत एकूण 57 उमेदवारांनी 102 फार्मची उचल केलेली आहे. आज बारगाव ता. वरुड येथील श्रीधर प्रभाकर सोलव यांनी दोन नामनिर्देशनपत्र भरले आहेत. एक नामनिर्देशनपत्र अपक्ष म्हणून आणि दुसरे नामनिर्देशनपत्र भाजप उमेदवार म्हणून भरण्यात आले आहे. आतापर्यंत निवडणूक निर्णय अधिकारी यांनी एकूण तीन नामनिर्देशन पत्र स्वीकारले आहेत.

### बंडाळी की, निवडणूकीला गुंडाळी

# प्रिती बंड आज घेणार निर्णय



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )-** बडनेरा मतदारसंघात शिवसेना(उबाठा) ने उमेदवारी नाकारल्यानंतर आता काय करावे, या निर्णयावर थांबलेल्या प्रिती बंड व त्यांचे समर्थक उद्या शनिवारी(दि.26) एका पत्रकार परिषदेतून आपला निर्णय जाहीर करणार असल्याची माहिती आहे. त्यामूळे बंडाळी करायची की, निवडणूकच गुंडाळायची हे उद्या स्पष्ट होणार आहे.

बडनेरा विधानसभा मतदारसंघातील विद्यमान आमदार रवी राणा यांना फक्त प्रीती बंडच मात देवू शकतात, असा विश्वास बंड समर्थकांना असल्यामूळे आ.राणा यांनी शिवसेनेतील काही लोकांना हाताशी धरुन ही उमेदवारी मॅनेज केली असल्याचा आरोप बंड समर्थकांकडून होत आहे. प्रीती बंड या 100 टक्के उमेदवारी मिळणार असा त्यांचा विश्वास असताना अचानक शिवसेनेचे जिल्हाप्रमूख सुनिल खराटे यांना ही उमेदवारी घोषीत करण्यात आली. या उमेदवारीची घोषणा होताच बंड समर्थकांमध्ये प्रचंड रोष पहायला मिळाला. बंड यांच्या समर्थनार्थ एका सभेचे आयोजन करत स्वतंत्र लढण्यावर भर देण्याकरिता चर्चा करण्यात आली. परंतू प्रिती बंड यांनी उध्दवसाहेबांना गाऱ्हाणे घालू आणि मगच पुढचा निर्णय घेवू असे जाहीर केले होते. परंतू काही वेळाने हा निर्णय तेव्हा बदल्यात आला, जेव्हा मातोश्रीवर कुणीही बंड यांचे कॉल रिसीव्ह करित नव्हते. आपले फोनच उचलले जात नसतील, तर मातोश्रीवर जाण्यात उपयोग काय, असे सांगण्यात आले. त्यानंतर बडनेरा मतदारसंघातील निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडून नामांकन अर्ज उचलल्याचीही माहिती आहे. याबाबत शनिवारी एका पत्रकार परिषदेतून त्या आपला निर्णय घोषीत करणार असल्याचे समजते.

### बच्चु कडू, तुषार भारतीयांवर नजरा





लोकसभेमध्ये आ.बच्चु कडू यांनी दिनेश बुब यांच्या रुपाने नवनित राणांसमोर आव्हान उभे करत त्यांना घरी बसविले. तर तुषार भारतीय यांनी भाजपमधून तटस्थ भूमिका घेतली. आता पुन्हा एकदा रवि राणांना घरी बसविण्याकरिता हे दोघे काय भूमिका घेणार आहे, यावर सर्वांचे लक्ष लागून आहे.

# देशी बनावटीचे पिस्टलसह एकास अटक

### गुन्हे शाखा युनिट क्रमांक 1 ची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )** - गुन्हे शाखेच्या पोलिसांनी देशी बनावट पिस्टलसह एका आरोपीला अटक केली. रेहान अहमद वल्द ईरफान अहमद (23, रा. छाया नगर विहीरीजवळ नागपूरी गेट, अमरावती) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या ताब्यातून 25 हजार रुपये किमंतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी रेकॉर्डवरिल गुन्हेगार व तसेच पूर्व वैमन्यस्यातून घडणार्या गुन्हातील तक्रारदार व आरोपी यांची तपासणी करून, गुन्हेगारी पार्श्वभूमी असणार्या गुन्हेगांरावर प्रभावी प्रतिबंधक कार्यवाही करण्याबाबत आदेशीत केले होते. त्याच अनुषगाने गुन्हे शाखा युनीट क्रमांक 1 चे पोलीस अधिकारी व अमलदार हे नागपूरी गेट भागात आरोपींचा शोध घेत होते. दरम्यान 24 ऑक्टोबर रोजी गुन्हे शाखा युनीट 1 चे अधिकारी व अंमलदार पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये पेट्रोलींग करीत असतांना गुप्त माहीती मिळाली की, जमील कॉलनी येथील युसूफ हॉलजवळ रेकॉर्डवरिल गुन्हेगार रेहान हा स्वतःजवळ बंदूक बाळगून काहीतरी गंभीर स्वरूपाचा गुन्हा करण्याच्या बेतात आहे. सदर माहीतीवरून पोलिसांनी युसूफ हॉलचे समोर सापळा रचून त्याला घेराव घालुन ताब्यात घेतले. पोलिसांनी त्याची अंगझडती घेतली असता त्याच्या कंबरीत मागील बाजुस एक लोखडी गावठी पिस्तुल/कटटा खोचुन असल्याचे दिसून आले. त्यामुळे पोलिसांनी या आरोपीविरूध्द नागपूरी गेट येथे तक्रार दाखल करून गुन्हा नोंद केला. आरोपी व मुददेमाल नागपूरी गेट पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला. पुढील तपास नागपूरी गेट पोलिस करत आहे. सदरची कारवाई पोलीस आयुक्त नवीनचन्द्र रेडडी, पोलीस उपायुक्त कल्पना बारवकर, सागर पाटील, सहायक पोलीस आयुक्त शिवाजी बचाटे, अरूण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली युनिट क्रमांक 1 चे वरिष्ठ पोलीस निरिक्षक गोरखनाथ जाधव, एपीआय मनीष वाकोडे, पोलिस उपनिरीक्षक प्रकाश झोपाटे, पोलिस हवालदार सतीष देशमूख, फिरोज खॉन, अलीमउददीन खतीब, नाझीमउददीन सैयद, विकास गुडदे, सुरज चव्हाण, निखील गेडाम, अमोल मनोहर, चालक रोशन माहुरे, किशांर खेंगरे यांनी केली आहे.

# जबरी चोरीतील गुन्हेगारांना 2 तासात अटक

### अमरावती शहर गुन्हे शाखेची कारवाई



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )** - जबरी चोरीच्या गुन्ह्यातील आरोपींना दोन तासात अटक करण्यात आली. अमरावती शहर गुन्हे शाखा युनिट क्रमांक 2 च्या पथकाने ही कारवाई केली. ऋषीकेश उर्फ गोंडी उमेश मोडक (26, रा. व्यंकयापुरा, अमरावती), मनीष रामदास कुंभरे (24, रा. वृंदावन कॉलनी, चिलम छावणी, अमरावती) व सुमीत सुभाष सौरंगे (19, रा. वृंदावन कॉलनी, अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. याप्रकरणात एका विधी संघर्षीत बालकाला ताब्यात घेण्यात आले आहे. आरोपींच्या ताब्यातून दुचाकी व अन्य साहित्य असा एकुण 80 हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

24 ऑक्टोबर रोजी विजय गिरजाप्प बहीरट (रा. दिवानखेड. ता. तिवसा, जि. अमरावती) यांनी गाडगेनगर पोलिस ठाण्यात या जबरीच्या चोरीच्या घटनेची तक्रार दिली होती. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला होता. या गुन्ह्यात पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांच्या आदेशाने गुन्हे शाखा युनिट 2 चे पोलीस निरीक्षक बाबाराव अवचार यांच्या नेतृत्वात अधिकारी व अंमलदारांनी पेट्रोलींगदरम्यान चारही जणांना चिलम छावणी परिसरात पाठलाग करून मोठ्या शिताफीने ताब्यात घेतले.

# कुख्यात रूपेश ऊर्फ बिट्टू वर एमपीडीए ची कारवाई

### वर्षभरासाठी मध्यवर्ती कारागृहात रवानगी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )** - कुख्यात गुन्हेगार रूपेश ऊर्फ बिटटु विनोद वानखडे (23 वर्ष, रा. पंचशील नगर, अमरावती) याच्याविरुध्द एमपीडिए कायद्याअंतर्गत कार्यवाही करून, त्याला वर्षभरासाठी अमरावती जिल्हा मध्यवर्ती कारागृहात स्थानबध्द करण्यात आले आहे.

अमरावती शहर येथील कुख्यात गुन्हेगार रूपेश ऊर्फ बिटटु विनोद वानखडे हा सन 2022 पासुन गुन्हेगारी कार्यवाहीमध्ये सक्रीय आहे. त्याच्याविरूध्द फ्रेजरपुरा पोलिस ठाण्यात अश्लील शिवीगाळ करणे, गंभीर दु:खापत करणे, गृह अतिक्रमण करणे, सामाईक ईरादा करणे, शिवीगाळ करून शांतता भंग करणे, धमकी देणे, जिवाने मारण्याची धमकी देणे, घातक शस्त्रजवळ बाळगणे, अधिसुचनांचे उलघंन करणे, हद्दपार आदेशाचे उल्लघंन करणे, अशा प्रकारचे गंभीर स्वरूपाचे एकुण 16 गुन्हे दाखल आहे. त्याच्यावर यापुर्वी प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेले आहे. तसेच त्याला तडीपार सुध्दा करण्यात आले होते. तरी सुध्दा तो गुन्हेगारी क्षेत्रात सकीय आहे. त्यामुळे त्याच्याविरूध्द वरीष्ठ पोलीस निरीक्षक निलेश करे यांनी एमपीडीएचा प्रस्ताव तयार केला. या प्रस्तावाची एसीपी कैलास पुंडकर, पोलिस उपायुक्त सागर पाटील, कल्पना बारवकर यांच्या मार्फतीने एसीपी शिवाजी बचाटे व पोलिस निरीक्षक सिमा दाताळकर यांच्या मार्गदर्शनाखाली एम.पी.डी.ए.सेलमधील सहायक पोलिस निरीक्षक इम्रान नायकवडे, पोलीस अंमलदार विनय गुप्ता, अजय मिश्रा, चेतन कराडे, पोलिस हवालदार विनोद इंगळे यांनी पुर्तता केली. सदर प्रस्तावावर पोलीस आयुक्त नविनचंद्र रेड्डी यांनी 24 आक्टोबर रोजी आदेश पारीत केले. या आदेशाची तामिल वरिष्ठ पोलीस निरीक्षक निलेश करे यांच्यामार्फत करण्यात आली. त्यानंतर गुन्हेगार रूपेश ऊर्फ बिटटु विनोद वानखडे याला स्थानबध्दतेच्या कालावधीकरीता मध्यवर्ती कारागृह दाखल करण्यात आले. यापुढेही शहरातील सराईत गुन्हेगारांवर एम.पी.डी.ए. कायदयाखाली कारवाई करण्यात येणार आहे.

# त्या फरार नराधमाला अटक

### गाडगेनगर पोलिसांची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )** - लैंगिक अत्याचार प्रकरणातील एका आरोपीला गाडगेनगर पोलिसांनी 24 ऑक्टोबर रोजी अटक केली. प्रवीण बळीराम राठोड (40, रा. बोरगाव पुंजी, ता. आर्णी, जि. यवतमाळ) असे आरोपीचे नाव आहे.

फिर्यादी महीलेच्या तक्रारीनुसार, 3 ऑक्टोबर रोजी ती महिला न्यायालयात आली होती. त्यावेळी आरोपीने तिच्यासोबत जवळीक साधण्याचा प्रयत्न करत होता. त्यानंतर ती ऑटोत बसून अमरावती बस डेपो येथे निघाली असता प्रविण व त्याचा मित्र सुमित असे दोघेही तिचा पाठलाग करीत बसडेपो येथे आले. त्यांनी महिलेला जबरदस्तीने दुचाकीवर मधात बसविले आणि त्याच्या जवळील चाकु सारखे शस्त्र दाखवून सोबत नेले. त्यानंतर प्रवीणने तिला यवतमाळाच्या घाटात नेले व तेथे प्रवीणने महिलेसोबत जबरदस्ती शारीरीक संबंध प्रस्थापीत केले. त्यानंतर 4 ऑक्टोबर रोजी महिलेला परत पुसदच्या घाटात नेले आणि पुन्हा शारीरीक संबंध केले. त्यानंतर 5 ऑक्टोबर रोजी तिला अमरवतीत परत आणून सोडले. या घटनेच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी आरोपींविरुध्द गुन्हा दाखल करुन तपासात सुरु केला. या गुन्ह्यातील फरार आरोपी हा शाम चौकातील जेडी मॉल येथे येणार असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. त्यानंतर पोलिसांनी सापळा रचुन आरोपीला ताब्यात घेतले.

# आजाराला कंटाळून डॉक्टरची आत्महत्या

### शेकदरी धरणात घेतली उडी



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.25 )** - पोष्ट ऑफिस परिसरातील रहिवासी डॉ.दिपक बोबडे यांनी आपल्या आजाराला कंटाळून शेकदरी धरणात उडी घेत आत्महत्या केली. ही घटना गुरुवारी(दि.24) घडली.

डॉ.दिपक बोबडे यांचा दवाखाना ग्राम बेनोडा शहीद येथे आहे. गुरुवारी नेहमीप्रमाणे दुपारच्या सुमारास पेशंट ला पाहून येतो असे सांगून ते दुचाकीने घरून निघाले. परंतू संध्याकाळपर्यत ते घरी परतलेच नाही. कुटूंबियांनी त्यांचा शोध घेतला. परंतू पत्ता न लागल्याने याबाबत पोलिसांना माहिती दिली. दरम्यान काही वेळाने त्यांची दुचाकी शेकदरी धरणाच्या भिंतीवर आढळून आली. त्या दुचाकीच्या स्विचजवळ एक सुसाईड नोट आढळून आली. ज्यामध्ये त्यांनी आजारपणाला कंटाळून या जगाचा निरोप घेत आहे, मला माफ करा, अशा आशयाची माहिती लिहून ठेवल्याचे दिसून आले. त्यानंतर पोलिसांनी त्यांची दुचाकी त्यांच्या नातेवाईककडे नेऊन ठेवली. अंधार पडल्याने शोधकार्यात अडथळा येत होता. त्यानंतर शुक्रवारी (दि.25) त्यांच्या शोधकार्याला सुरुवात झाली. दुपारी स्थानिक गोताखोरांच्या मदतीने त्यांच्या मृतदेहचा शोध घेण्यात आला. शेकदरी धरणाच्या पाण्यातील झुडूपात त्यांच्या मृतदेह आढळून आला. त्यांच्या दोन्ही हातावर चिरे मारल्याचे दिसून आले. डॉ.दिपक यांना पोहता येत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे हाताची नस कापून त्यांनी आत्महत्या करण्याचा सुद्धा प्रयत्न केला असावा असा अंदाज वर्तविण्यात येत आहे.

# जिल्ह्यात आज 15 उमेदवाराचे नामांकन अर्ज दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )** - विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत नामांकन अर्ज दाखल करण्याच्या चौथ्या दिवशी 15 उमेदवारांनी नामांकन अर्ज दाखल केले. ज्यामध्ये अमरावती-1, बडनेरा - 2, अचलपूर -1, मेळघाट-2, मोर्शी - 1, तिवसा - 2, दर्यापूर - 3, धामणगाव रेल्वे - 3 उमेदवारांनी अर्ज दाखल केले.

36 धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघात देश जनहित पार्टीकडून निलम देविदासजी रंगारकर, अक्षयकुमार नारायण गुडधे - आंबेडकरवादी रिपब्लीकन पार्टी, प्रताप अरूणराव अडसड - भारतीय जनता पार्टी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. 37 बडनेरा विधानसभा मतदारसंघात राहुल नाना काजळे - अपक्ष, ॲड. राजू बक्षी जामनेरकर - अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. 38 अमरावती विधानसभा मतदारसंघात अनुष्का विजय बेलोरकर - अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला.

39 तिवसा विधानसभा मतदारसंघात कमलसिंह विजयसिंह चितोडिया - अपक्ष, प्रदिप गंगाधर महाजन - अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. 40 दर्यापूर विधानसभा मतदारसंघात ॲड. विद्यासागर गंगारामजी वानखडे-बहुजन समाज पार्टी, संजय हिरामणजी आठवले - शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे), शरद जानराव आठवले - अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. 41 मेळघाट विधानसभा मतदारसंघात महेंद्र किशोर पटेल - अपक्ष, श्यामकुमार कृपाराम पटोरकर- अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. 42 अचलपूर विधानसभा मतदारसंघात प्रविण वसंतराव तायडे - भारतीय जनता पक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. 43 मोर्शी विधानसभा मतदारसंघात श्रीधर प्रभाकरराव सोलव - भारतीय जनता पक्ष यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

# वण्यप्राणी पकड मोहिम उठली जीवावर

### पुन्हा एका वनरक्षकाचा मोडला हात, चार दिवसात दोघांचे हात निकामी

### बेलोरा विमानतळ येथील प्राणी पकडण्याची मोहिम फसण्याच्या मार्गावर

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )-** बेलोरा विमानतळ परिसरातील वण्यप्राणी पकडण्याची मोहीम वनविभागातील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या जीवावर उठली असून शुक्रवारी प्राणी पकडताना पुन्हा एकदा एका वनरक्षकाचा हात मोडल्याची घटना समोर आली. या मोहिमेत चार दिवसात दोघांचे हात निकामी झाले आहे. तीन दिवसांपुर्वी वण्यप्राण्यांच्या मागे धावताना एका तीमाही मजूराचा हात मोडल्याची घटना समोर आली होती. ज्याच्या हातावर तातडीने शस्त्रक्रिया करावी लागली.



60 लाखात विकला जिल्ह्यातील वनविभाग?

बेलोरा विमानतळ परिसरातील वण्य प्राणी बाहेर काढण्याकरिता विमानतळ प्राधिकरणाने वनविभागाला 60 लाख रुपयांमध्ये करार केल्याची माहिती आहे. परंतू हा करार वनविभागाच्या अधिकाऱ्यांच्या गळ्यात अडकलेल्या हाडाप्रमाणे झाला आहे. त्यांना गिळताही येत नाही, आणि बाहेरही टाकता येत नाही.

गेल्या तीन महिन्यांपासून सुरु असलेल्या या मोहिमेमध्ये वनविभागाला बोटावर मोजण्याइतके वण्यप्राणी पकडता आहे. अजूनही 100 हून अधिक वण्यप्राणी या 500 एकराच्या परिसरात दडून बसले आहे. शुक्रवारी या प्राण्यांना काढण्याच्या मोहिमेमध्ये 6 वनपाल, 18 वनरक्षक, 10 वनमजूरांना येथे वण्यप्राणी पकडण्याच्या मोहिमेत जुंपले होते. डफळे, शिट्टी, पुंग्या घेवून वण्यप्राण्यांना पकडण्याचा प्रयत्न करित असताना वण्यप्राण्याने धडक दिल्याने वनरक्षक हेमंत पांगरे यांच्या हाताला इजा झाली. त्यानंतर मोहिम रद्द करुन तातडीने त्यांना दवाखान्यात नेण्यात आले, तेथे त्यांचा हात फ्रॅक्चर असल्याचे कळले.

### खासगी कंपनीचेही हात वर

यापुर्वी विमानतळ प्राधिकरणाने एका खासगी कंपनीला हा कंत्राट देवू केला होता. परंतू त्या कंपनीने हात वर हा कंत्राट घेतला नसल्याची माहिती आहे. अत्यंत प्रशिक्षीत रेस्क्यु पथक असलेल्या कंपनीने हात वर केल्यावर वनविभागाने 60 लाखांच्या मोहापायी हा कंत्राट घेतला, आणि आता दगडावर डोके आपटण्याची वेळ त्यांच्यावर आली आहे.

### वाढलेले गवत अडसर

या 500 एकराच्या प्लॉटमध्ये मोठ्याप्रमाणात पुरुषभर उंचीचे गवत वाढलेले आहे. एखादा वण्यप्राणी तुमच्या बाजूला उभा असेल तरी कळत नाही. अश्या परिस्थितीत या वण्यप्राण्यांना पकडण्याची छेडलेली मोहिम अंधारात तीर चालविल्याप्रमाणे होत आहे.

### तुम्ही एसीएफसोबतच बोला

बेलोरा विमानतळ परिसरातून आतापर्यंत किती प्राणी पकडण्यात आले, याची माहीती घेण्याकरिता वडाळी वनपरिक्षेत्र अधिकारी वर्षा हरणे यांना फोन केला असता, प्राणी पकडण्याची प्रक्रीया सुरु आहे. तुम्ही याबाबतीत एसीएफ भैलुमेंसोबत बोला असे सांगून हात झटकले.

सहायक वनसंरक्षक(कॅम्पा व वन्यजीव) भैलूमे यांना संपर्क साधला असता त्यांनी कॉल रिसिव्ह केला नाही, त्यामूळे आतापर्यंत बेलोरा विमानतळ परिसरात नेमके किती प्राणी पकडले याची माहिती मिळू शकली नाही.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# ट्रक-दुचाकी अपघातात युवक ठार

## अपघातानंतर पुसलावासियांचा रास्ता रोको ■ अनेक वर्षापासून कासवगतीने सुरु आहे मार्गाचे काम



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि.25 )** – गेल्या अनेक वर्षापासुन पुसला ते धनोडी मार्गावरील वनविभागाच्या हद्दीत येणारा रस्ता अपूर्ण असल्यामुळे आतापर्यंत येथे अनेक अपघात घडले आहे. शुक्रवारी सकाळच्या सुमारास दुचाकी आणि ट्रकच्या अपघातात एका युवकाला प्राण गमवावे लागले. या अपघातानंतर पुसला ग्रामवासियांनी सकाळपासुनच रास्ता रोको आंदोलन छेडले. या ठिकाणी वनविभागाचे अधिकारी आणि पोलिस प्रशासनाच्या अधिकाऱ्यांनी भेटी दिल्या परंतु गावकऱ्यांचे समाधान न झाल्यामुळे वृत्त लिहिस्तोवर आंदोलन सुरुच होते.



सविस्तर माहीतीनुसार, शुक्रवारी सकाळच्या सुमारास पुसला येथील निलेश प्रकाश डोंगरे नामक युवक एम.एच.27/बीडी 1820 या क्रमांकाच्या दुचाकीने वरुडकडे जात होता. धनोडी मार्गावरील पुसला नजीकच्या वनविभागाच्या डेपो समोर धनोडीकडून पुसला कडे येत असलेल्या युपी 78/ एफएन 3003 क्रमांकाच्या ट्रक आणि दुचाकीची जोरदार धडक झाली. या धडकेत निलेश डोंगरे याचा घटनास्थळावरच मृत्यू झाला. अपघाताचे वृत्त कळताच पुसला व परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी चांगलीच गर्दी केली. हा रस्ता वनविभागाच्या अखत्यारित येत असल्यामुळे आतापर्यंत अनेक अपघात या परिसरात झाले आहे, हा रस्ता कायमस्वरुपी दुरुस्त करण्याची



मागणी गेल्या अनेक वर्षापासुन सुरु आहे. परंतु वनविभागाच्या अडेलतट्टू धोरणामुळे नागरिकांच्या या मागणी सतत दुर्लक्ष केल्या जात आहे. अशा स्थितीत आजचा अपघात झाल्यामुळे गावकऱ्यांनी अमरावती पांढूर्णा हा राष्ट्रीय महामार्ग बंद करुन चक्काजाम आंदोलनाला सुरुवात केली होती. जोपर्यंत वनविभाग आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी घटनास्थळावर येत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरुच ठेवण्याचा निर्धार गावकऱ्यांनी केला होता. घटनास्थळावर वनपरिक्षेत्र अधिकारी प्रशांत भुजाडे, शेंदुरजनाघाटचे ठाणेदार दिपक महाडिक, वरुड आणि बेनोडा (शहीद) येथील पोलिसांचा ताफा सुध्दा दाखल झाला होता.

अधिकाऱ्यांनी आंदोलनकर्त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, परंतु कोणीही समजुन घेण्याच्या स्थितीत नसल्यामुळे वृत्त लिहीस्तोवर आंदोलन सुरुच होते. दरम्यान शेंदुरजनाघाट पोलिसांनी घटनास्थळ गाठुन घटनास्थळाचा पंचनामा करुन मृतदेह उत्तरीय तपासणीकरीता वरुड ग्रामीण रुग्णालयात रवाना केले.

### गावकऱ्यांचा रोष कायम

दुपारच्या सुमारास निलेश डोंगरे यांच्या पार्थिवाचे शवविच्छेदन करुन मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात सुध्दा देण्यात आले, परंतु तरीही गावकऱ्यांचा प्रशासनावरील रोष कमी होतांना दिसत नव्हता. त्यामुळे आता हे आंदोलन काय वळण घेते ? याकडे संपुर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.



# मोर्शीच्या फटाका मार्केटला रेणुकानगर वासीयांचा विरोध

## उपविभागीय अधिकारी यांना शेकडो सह्यांचे निवेदन

**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी,( दि.25 )** – मोर्शी शहराचे मध्यभागी असलेल्या सोशल क्लबचे मैदानावर दिवाळीच्या पर्वावर भरविण्यात येणार असलेले फटाका मार्केट लावण्यात येऊ नये असे, अशी मागणी करत रेणुका नगर वासियांनी या दुकानांना तीव्र विरोध दर्शविला आहे. उपविभागीय अधिकारी, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी आणि मोर्शी ठाणेदार यांना आपल्या मागणीचे एक निवेदनही दिले आहे. गेल्या अनेक वर्षापासून शहरातील सोशल क्लबचे मैदानावर दिपावलीच्या दरम्यान परवानाधारक फटाका व्यवसायिक येथे दुकाने लावून फटाका विक्री करतात. येथे फटाका विक्रीचे दुकाने लावण्याकरिता हजारो रुपयांचे भाडे सोशल क्लबच्या पदाधिकाऱ्यांना दुकानदारांकडून देण्यात येत असते. पण या ठिकाणी आगीसारखा अनुचित प्रकार घडल्यास, आग विझविण्याकरिता कुठलीच व्यवस्था करण्यात येत नाही. सोशल क्लबला लागून असलेल्या रेणुका नगर मध्ये मोठ्या प्रमाणावर गोरगरीब मजूर वर्ग राहत असून त्यांची कच्ची घरे आहेत. जर या ठिकाणी असलेल्या फटाका मार्केटला आग लागली तर या आगीचा सर्वाधिक फटका रेणुकानगर येथे वास्तव्यास असलेल्या नागरिकांना बसणार आहे. त्यामुळे या ठिकाणी प्रशासनाने फटाका मार्केट लावण्याची परवानगी देऊ नये. प्रशासनाने या ठिकाणी दुकाने लावण्यात परवानगी दिली व या ठिकाणी कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यास प्रशासन जबाबदार राहील, असे परिसरातील शेकडो नागरिकांच्या सह्यांची निवेदन उपविभागीय अधिकारी, मुख्याधिकारी नगरपालिका, मोर्शी ठाणेदारांना दिले.

# प्रा.वीरेंद्र जगताप धामणगाव रेल्वे विधानसभा मतदारसंघात मविआ चे उमेदवार

## कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड उत्साह

**महासागर प्रतिनिधी**

**चांदुर रेल्वे,( दि.25 )** – धामणगाव विधान सभा क्षेत्रात भाजप चे उमेदवार निश्चित झाले असतांना त्यांचे प्रतिस्पर्धी असलेल्या काँग्रेसतर्फे उमेदवाराच्या नावाची घोषणा झाली नव्हती, त्यामुळे मतदारसंघात अनेक चर्चांना उधाण आले होते. त्यातच गुरुवार दि.24 रोजी काँग्रेस तर्फे उमेदवारांची पहिली यादी प्रदर्शित झाली पहिल्याच यादीत प्रा.वीरेंद्र जगताप यांचे नाव आल्याने मतदार संघातील



काँग्रेस व महविकास आघाडी मधील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

या मतदार संघामध्ये काँग्रेस विरुद्ध भाजप अशी परंपरागत लढाई पाहायला मिळते, त्यातच भाजप तर्फे उमेदवाराचे नाव घोषित झाल्यानंतरही काँग्रेस तर्फे यादी प्रसारित न झाल्याने काँग्रेस गोटात अस्वस्थता पाहायला मिळत होती, त्यातच ही जागा ठाकरे शिवसेना गटाला सुटणार अशीही चर्चा मतदार संघात होती. अशातच गुरुवारी आलेल्या काँग्रेसच्या पहिल्याच यादीत प्रा.जगताप यांचे नाव आल्याने सर्वत्र उत्साहाचे वातावरण आहे. महाविकास आघाडीचे कार्यकर्ते कामाला लागले आहे.

येत्या 28 तारखेला प्रा.वीरेंद्र जगताप आपला उमेदवारी अर्ज भरणार असून त्याच दिवशी सायंकाळी भव्य सभेत प्रचाराचे नारळ फोडणार असल्याची माहिती आहे.

# 'उर्ध्व वर्धा'तून रब्बी सिंचनासाठी पाच पाणीपाळ्या प्रस्तावित

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.25 )**–उर्ध्व वर्धा प्रकल्पातून रब्बी हंगामासाठी पाणीसाठा उपलब्ध असून पाच पाणी पाळ्या देण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी लाभक्षेत्रातील शेतकरी बांधवांनी 10 नोव्हेंबरपूर्वी संबंधित शाखा कार्यालयास अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

उजवा मुख्य कालव्याच्या आरंभापासून 95.50 किमीपर्यंत व डावा मुख्य कालव्याच्या 42.40 किमीपर्यंतच्या लाभक्षेत्रातील सर्व वितरिका, जलाशयावरील अधिसूचित नदीनाल्यांवरील लाभधारकांना रब्बी हंगामासाठी पाणी देण्यात येईल. वितरण व्यवस्थेद्वारे जिथे सुलभपणे पाणी जाऊ शकते तिथपर्यंत कालवा संचलन कार्यक्रमानुसार 'पुच्छ भागाकडून ते मुखाकडे' (टेल टु हेड) या तत्त्वानुसार सिंचन होणे आवश्यक आहे.

कालव्याचे प्रवाही किंवा कालव्यावरील, नदी–नाल्यांवरील मंजूर उपसा सिंचन योजनांद्वारे सिंचनासाठी पाणी घ्यावयाचे असल्यास पाणी मागणी अर्ज नमुना क्र. 7 संबंधित शाखा कार्यालयात विनामूल्य उपलब्ध आहेत. ते भरून 10 नोव्हेंबरपर्यंत तिथेच सादर करावेत, असे आवाहन उर्ध्व वर्धा पाटबंधारे विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांनी केले आहे. रब्बी हंगामात नोव्हेंबर 2024 अखेरपर्यंत या कालावधीत मागणीप्रमाणे पाच पाणी पाळ्या देण्यात येतील.

### शेतचारा स्वच्छ ठेवा

कालव्याचे पाणी शेतात नेण्यासाठी असलेली शेतचारी स्वच्छ व व्यवस्थित ठेवण्याची जबाबदारी लाभधारकांची आहे. शेतचारी स्वच्छतेअभावी पाणी पुरवठ्यामध्ये व्यत्यय आल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. उडाफ्याचे क्षेत्रास पाणीपुरवठा करण्यात येणार नाही व तसेच लाभधारकांनी मंजूर क्षेत्राचे मर्यादेपर्यंत कालवा व नदी–नाल्याच्या पाण्याचा वापर करावा. मंजूरीपेक्षा जादा क्षेत्र भिजविल्यास व अनधिकृतपणे पाणी घेतल्यास नियमाप्रमाणे पंचनामा करुन दंडनीय आकारणी करण्यात येईल. मंजूर न केलेल्या क्षेत्रास पाणी पुरवठा करण्याची जबाबदारी या कार्यालयावर राहणार नाही. लाभधारकाने दिवस व रात्री पाणी घेणे बंधनकारक आहे. अडचणी असल्यास कोणत्याही प्रकारची आगाऊ सूचना न देता पाणी पाळी पत्रकात बदल करण्याचे अधिकार कार्यकारी अभियंता यांना राहतील. थकबाकीदार लाभधारक व थकबाकीदार पाणीवापर संस्थांना पाणी देणे बंधनकारक राहणार नाही. वितरिका पाणी पाळीमध्ये पाणी चालू असताना लाभधारक वितरिकेचा दरवाजा वेळी–अवेळी कमी–जास्त प्रमाणात उघडतात. त्यामुळे त्या वितरिकेवरील चालू असलेल्या पाण्याचा विसर्ग कमी जास्त होऊन 'टेल टू हेड' सिंचनावर विपरीत परिणाम होतो व त्यामुळे त्या वितरिकावरील पिकांना संचलनाप्रमाणे पाणीपुरवठा होत नाही. त्यामुळे प्रस्तावित पाणी पाळी कालावधीत वाढ होते.

### लाभधारकांनी नियम पाळणे आवश्यक

इच्छुक लाभधारकांनी त्यांच्याकडील थकबाकीची एक तृतीयांश व चालू हंगामाची अग्रिम पाणीपट्टी भरावी. उपसा सिंचन लाभधारकांनी नळमार्गावर पाणी मोजमाप यंत्र बसवावे. पिकांचे मागणी क्षेत्र 20 आर या पटीत असावे. पाणी अर्ज मंजूर करुन घेऊनच उपसा सिंचनासाठी पाणी वापर करावा. मंजूर क्षेत्रासाठी कालव्याचे पाणी घेण्यात येणारी शेतचारी व विहिरीवरील शेतचारी यात तीन मीटरचे अंतर असावे. लाभक्षेत्रातील कालव्यापासून 35 मी. पर्यतच्या विहिरींच्या पाण्याने सिंचित होत असलेल्या नगदी पिकांसाठी (उदा. ऊस, कापूस, केळी व फळबाग) पाटबंधारे अधिनियमानुसार प्रवाही सिंचनाच्या मूळ दराच्या 50 टक्के दर लागू असेल. पाणीपट्टी न भरणा–या लाभधारकास सिंचनासाठी पाणी देणे या कार्यालयावर बंधनकारक राहणार नाही. व त्यांचा पाणीपुरवठा केव्हाही बंद करण्यात येईल व थकबाकीवर शासन निर्णय नियमानुसार द.सा.द.शे. 10 टक्के दरान विलंब आकारण्यात येईल.

# जिजाऊ बँक विदर्भातील अग्रगण्य, भक्कम व सक्षम बँक-कोठाळे

## शांततेत पार पडली बँकेची आमसभा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.25 )** – जिजाऊ बँक ही विदर्भातील अग्रगण्य बँक असून आर्थिक क्षमतेने भक्कम व सक्षम असल्याचे प्रतिपादन केले. बँकेचे अध्यक्ष अविनाश कोठाळे यांनी केले. ते नुकत्याच पार पडलेल्या आमसभेमध्ये अध्यक्ष स्थानावरुन प्रास्ताविक सादर करताना बोलत होते.

शहीद भगतसिंग यांचे जन्मदिनी अमरावती शहरातील अभियंता भवन येथे पार पडलेल्या आमसभेमध्ये 700 पेक्षा जास्त भागधारक सभासदांनी सहभाग नोंदविला. याप्रसंगी बँकेच्या सार्वत्रिक निवडणुका 31 डिसेंबर 2023 ला पार पडलेल्या निवडणूकांनंतर बँकेचे नवनियुक्त संचालक मंडळ जानेवारी 2024 मध्ये कार्यरत झाले. रिझर्व बँकेच्या




निर्देशानुसार व्यवस्थापन मंडळात संस्थापक उपाध्यक्ष राजेंद्र जाधव यांची अध्यक्षपदी नियुक्ती करून व्यवस्थापन मंडळ कार्यरत केले. बँकेच्या 15 संचालक मंडळामध्ये 10 संचालक सहकार पॅनलचे निवडून देऊन संस्थापक अध्यक्षांसह सर्वांवर विश्वास दर्शविल्याबद्दल सभासदांचे आभार मानले. कोठाळे पुढे म्हणाले की, सन 2000 नंतर अमरावती शहरात आणि विदर्भात सुरू झालेल्या नागरी बँकांमध्ये बँक प्रथम क्रमांकावर असुन बँकेच्या ठेवी रु.396.63 कोटी, कर्ज रु.269.31 कोटी तसेच भाग भांडवल 14.46 व भाग भांडवल पर्याप्तता 15.84 आणि नक्त अनुत्पादक कर्ज रिझर्व बँकेच्या मापदंडाप्रमाणे 3 टक्केच्या आत आहे. नागरी सहकारी बँकिंग इंडस्ट्री मध्ये अनेक आव्हाने असून ग्राहकांची ठेवीवर जास्त व्याजदराची मागणी व कर्जदारांची स्वस्त व्याजदराची कर्जाची मागणी याचा समतोल राखून बँकेला नफा कमवून लाभांश भागधारकांना देणे हे आव्हान असल्याचे त्यांनी सांगितले. जिजाऊ बँकेने चालू वर्षात दहा टक्के लाभांश आम सभेत मंजूर केला बँकेने स्थापनेपासून 10 ते 15 टक्के पर्यंत लाभांश वाटून पारदर्शक व शिस्तबद्ध रितीने बँक चालविली व सभासदांनी सहकार्य दिले याबाबत त्यांचे आभार मानले. याप्रसंगी मंचावर उपाध्यक्ष प्रदिप चौधरी, सर्वश्री संचालक प्रा.अनिल बंड, बबनराव आवारे, प्रा.सुनिल चाफले, श्रीकांत टेकाडे, नितीन डहाके, डॉ.गौरव विधळे, डॉ.स्वप्निल वावरे, डॉ.पल्लवी बारब्दे, तज्ञ संचालक अरुण दुधाट व चार्टर्ड अकाऊंन्टंट विजय जाधव, अनिल टाले, अरविंद गावंडे, राजेन्द्र अढाऊ, प्रशांत गावंडे यांच्यासह अन्य पदाधिकारी, सभासद उपस्थित होते.

# भाजपमध्ये बंडाळीची शक्यता?

## जिल्हा उपाध्यक्ष श्रीधर सोलव यांचा अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल

**महासागर प्रतिनिधी**

**वरुड,( दि.25 )**– मोर्शी–वरुड विधानसभा मतदारसंघात महायुतीच्या उमेदवारीचा तिढा अद्यापपर्यंत सुटलेला नसताना, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष श्रीधर उर्फ बाळासाहेब सोलव यांनी शुक्रवार दि.25 ला भाजपाचे माजी नगरसेवक सुरेश दुर्गे व राजेंद्र काळे यांच्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल केल्यामुळे भाजपामध्ये बंडखोरी होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून मोर्शी–वरुड विधानसभा मतदारसंघ हा महायुतीमधून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे अपक्ष उमेदवार देवेंद्र भुयार यांना सुटणार अशी अपेक्षा होती. मात्र याला असलेल्या भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांकडून तीव्र विरोध झाला. याचे पडसाद थेट भारतीय जनता पार्टीचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचले एवढेच नाही तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार यांच्या समोर उमेदवारीचा तिढा निर्माण झाला, देवेंद्र भुयार यांना होणारा विरोध लक्षात घेता भारतीय जनता पार्टीने उमेश यावलकर यांना उमेदवारी देण्याची घोषणा जरी केली नसली तरी त्यांना उमेदवारी मिळणार हे जवळपास निश्चित झाले आहे. त्यामुळे अजित पवार गटाचे अपक्ष उमेदवार देवेंद्र भुयार काय करणार ? याकडे मतदार संघातील नागरिकांचे लक्ष लागलेले आहे. हे युद्ध क्षमत



नाही, तोच भारतीय जनता पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष श्रीधर उर्फ बाळासाहेब सोलव यांनी मंगळवार दि.25 ला दुपारी 2 वाजता उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी प्रदीप पवार यांच्या समक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला, त्यामुळे भारतीय जनता पार्टीमध्ये बंडखोरी होणार हे जवळपास निश्चित झाले आहे, असे झाल्यास याचा जबर फटका भारतीय जनता पार्टीला बसेल असे तज्ञांचे मत आहे. त्यामुळे भारतीय जनता पार्टीचे उमेदवार निवडून आणायचे असल्यास श्रीधर सोलव यांची उमेदवारी मागे घ्यावी लागेल.

त्यासाठी पक्षाने प्रयत्न करणे गरजेचे आहे अन्यथा महायुतीची तर सोडाच भाजपची सुद्धा सीट निवडून येणे कठीण असल्याचे बोलल्या जात आहे. त्यामुळे चंदू उर्फ उमेश यावलकर यांची उमेदवारी निश्चित होणार का?, असे झाले तर श्रीधर उर्फ बाळासाहेब सोलव हे उमेदवारी मागे घेणार का असे एक ना अनेक प्रश्न उपस्थित होत आहे. त्यामुळे ही निवडणूक भारतीय जनता पार्टीसाठी पाहिजे तेवढी सोपी नाही, असे चित्र सध्या तरी दिसून येत आहेत.

# 8 वर्षा पासून सुरु असलेल्या खटल्यातून मुक्तता

## काँग्रेस पदाधिकाऱ्यांना मोठा दिलासा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.25 )**– आमदार रावसाहेब शेखावत यांना झालेल्या मारहान प्रकरणाबाबत 8 वर्षाआधी विश्राम भवन येथे पोलिस आयुक्त व पोलीस निरीक्षकांविरुध्द नारेबाजी करुन त्यांना निलंबीत करा अशी नारेबाजी करणाऱ्या काँग्रेस पदाधिकाऱ्यांवर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. या खटल्याचा आठ वर्षानंतर निकाल लागला असून कोर्टाने सर्वांची निर्दोष मुक्तता केली आहे. गेल्या 8 वर्षापासून



कलम 294, कलम 135,कलम 137 (1) (3) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते व खटला न्यायालयात सुरुच होता. त्यानंतर दि.22 ऑक्टोंबर 2024 रोजी ॲड. झिया खान व सहयोगी ॲड. शाहरुख खान, ॲड. नरेश सोनी, ॲड. परवेझ अहेमद खान, ॲड. एम.बी.थोरात यांनी सदर खटल्यात परिश्रम घेऊन काँग्रेस नेत्यांना सन्मानपूर्वक निर्दोष मुक्त केले. यामध्ये प्रामुख्याने माजी अध्यक्ष वसंतराव साऊरकर, बबलु शेखावत, माजी महापौर विलास इंगोले, संजय अकर्ते, राजेंद्र महल्ले, अरुण जयस्वाल, प्रदीप हिवसे, राजा बांगडे, सागर देशमुख, मनिंदर मोंगा, देवयानी कुर्वे, अर्चना सवई, संजविनी दीक्षित, मालती दाभाडे यांच्यासह अन्य काँग्रेसजनांचा समावेश होता.